## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ३५६/२०२२ मधील निशाण १८ वरील आदेश

१. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचेविरुध्द हा अर्ज त्यांनी मे.तहसिलदार, खानापूर-विटा यांचे क्र./वहिवाट/एस.आर./१५/२०१८ मधील दि.०५.०२.२०१९ रोजीचे न्यायनिर्णय व आदेशा आधारे दावा मिळकत गट नं.२३८ व २५३ मधील वादी यांचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये, अशी त्यांचेविरुध्द अंतरिम मनाई ताकीद होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१, ३ व ५ यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे.

३. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द हक्कज्ञापन व मनाई करीता दावा दाखल केला आहे. त्यांनी निशाण ५ वर तूर्तातूर्त ताकिदीचा अर्ज दाखल केला आहे. दिवाणी न्यायालयास दि.०७.०५.२०२२ ते दि.०५.०६.२०२२ रोजी पर्यंत उन्हाळी सुट्टी असल्याने त्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी हे वादी यांचे जागेतून रस्ता करणेची दाट शक्यता आहे. त्याकामी निशाण ५ वरील अर्जावर अंतिम युक्तिवाद होणेस काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे, दरम्यानचे काळात प्रतिवादी यांनी मे.तहसिलदार, खानापूर-विटा यांचे दि.०५.०२.२०१९ रोजीचे आदेशानुसार दावा मिळकतीतून रस्ता करु नये व दावा मिळकतींतील वादी यांचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये, असा प्रतिवादी यांचेविरुध्द अंतरिम मनाई आदेश व्हावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**४.** प्रतिवादी क्र. १, ३ व ५ यांच्या म्हणण्यातील कथनांनुसार त्यांनी आज रोजी कैफियत व निशाण ५ वरील अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यामधील कायदेशीर मुद्यांच्या आधारे वादी यांचा निशाण ५ वरील हा अर्ज फेटाळण्यास पात्र असल्याचे दिसून येते. वादी यांनी हा अर्ज कोणत्या तरतूदीनुसार दाखल केला आहे, हे अर्जात नमूद नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी केली आहे.

**५.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.व्ही.कदम व प्रतिवादी क्र.१, ३ व ५ तर्फे विधीज्ञ श्री.एस.पी.दुग्गम यांचा युक्तिवाद ऐकला.

**६.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी हा दावा मे.तहसिलदार, खानापूर-विटा यांचा क्र./वहिवाट/ एस.आर./१५/२०१८ मधील दि.०५.०२.२०१९ रोजीचा न्यायनिर्णय व आदेश रद्दबातल असल्याचे जाहीर होऊन मिळणेसाठी व दावा मिळकतींतील त्यांचे कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी हरकत अडथळा करु नये, अशी निरंतर ताकीद होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे, असे दिसून येते. वादी यांनी निशाण ५ वर अर्ज दाखल करुन प्रतिवादी यांचेविरुध्द तूर्तातूर्त मनाई ताकिदीची मागणी केली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना दाव्याच्या समन्सची व नोटीसीची बजावणी झाली आहे. आज रोजी प्रतिवादी क्र.१, ३ व ५ हे हजर झाले असून त्यांनी त्यांची कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी वकिलपत्र दाखल करणेस मुदत घेतली आहे. प्रतिवादी क्र.४ हे याकामी हजर झालेले नाहीत.

**७.** वादी यांनी त्यांचे दाव्यामध्ये केलेली कथने पाहता त्यांनी याकामी मे.तहसिलदार, खानापूर-विटा यांचा क्र./वहिवाट/एस.आर./१५/२०१८ मधील

दि.०५.०२.२०१९ रोजीचा न्यायनिर्णय व आदेश आव्हानित केला आहे. वादी यांनी या न्यायनिर्णय व आदेशाविरुध्द मे.उपविभागीय अधिकारी, विटा यांचेकडे क्र.रस्ता/रिव्हीजन/२८९/२०२१ चे दाखल केले होते. परंतु, वादी यांचा तो रिव्हीजन अर्ज देखील दि.१६.०२.२०२२ रोजी फेटाळण्यात आला असून त्याकामी मे.तहसिलदार, खानापूर-विटा यांचा दि.०५.०२.२०१९ रोजीचा न्यायनिर्णय व आदेश कायम करणेत आला आहे. निशाण ३, अ.क्र.७ वरील मे.तहसिलदार, खानापूर-विटा यांचा दि.०५.०२.२०१९ रोजीचा आदेश पाहता त्या आदेशामध्ये वादातील रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे किंवा नाही, हे मोजणी करुन हद्दी निश्चित केल्याशिवाय समजून येत नाही आणि अर्जदार(म्हणजेच प्रतिवादी) यांच्या अर्जात तथ्य नसून परिस्थिती बरोबर नाही, असे अनुमान नोंदविल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी आज रोजी निशाण १७, अ.क्र.१ वर तहसिलदार, खानापूर-विटा यांचा दि.१७.०७.२०१९ रोजीचा दुरुस्ती आदेश दाखल केला आहे. त्या आदेशानुसार वर नमूद दि.०५.०२.२०१९ रोजीचे आदेशामधील ''अर्जदाराच्या अर्जामध्ये तथ्य नसून परिस्थिती बरोबर नाही'' या ऐवजी ''अर्जदाराच्या अर्जामध्ये तथ्य असून परिस्थिती बरोबर नाही'', अशी दुरुस्ती केली आहे. तथापि, तसे असले तरी मूळ आदेशातील ''परिस्थिती बरोबर नाही'' हे अनुमान तसेच ठेवल्याचे दिसून येते. मे.तहसिलदार, खानापूर-विटा यांच्या वर नमूद दोन्ही आदेशांचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या आदेशामध्ये नोंदविलेल्या अनुमानाशी विसंगत त्यांचे अंतिम आदेशामध्ये जाबदार म्हणजेच वादी क्र.१ यांना रस्त्यावरील अडथळा दूर करणेबाबत आदेश दिल्याचे दिसून येते. अभिलेखातील निशाण ३, अ.क्र.१४ वरील फोटो पाहता त्यामध्ये दिसत असलेल्या रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे, असे सकृतदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे, वादी यांनी केलेल्या कथनांमध्ये सकृतदर्शनी तथ्य दिसून येते.

८. वादी यांच्या कथनांनुसार दि.०७.०५.२०२२ ते दि.०५.०६.२०२२ रोजीपर्यंत दिवाणी न्यायालयास उन्हाळी सुट्टी असून त्या कालावधीमध्ये प्रतिवादी हे वादातील आदेशा आधारे रस्ता करणेची व दावा मिळकतींतील वादी यांचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करणेची शक्यता आहे. दि.०७.०५.२०२२ ते दि.०५.०६.२०२२ रोजीपर्यंत दिवाणी न्यायालयास उन्हाळी सुट्टी आहे, याबाबत वाद नाही. याकामी प्रतिवादी क्र.१, ३ व ५ हे आज रोजी हजर झाले असून त्यांनी त्यांची कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. परंतु, वादी यांना त्या कैफियत व म्हणण्याची प्रत आज रोजीच मिळाली आहे. प्रतिवादी यांनी मांडलेल्या बचावाचे अवलोकन करुन वादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी हजर होणेस व वकीलपत्र दाखल करणेस मुदत घेतली आहे. प्रतिवादी क्र.४ यांना समन्स व नोटीसीची बजावणी होऊन ते याकामी आज रोजी हजर झालेले नाहीत. त्यामुळे, याकामी निशाण ५ वरील तूर्तातूर्त मनाई ताकिदीच्या अर्जाची गुणदोषांवर चौकशी होणेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. तो पावेतो प्रतिवादी यांनी वादातील आदेशा आधारे कार्यवाही केलेस वादी यांचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी पुढील तारखेपावेतो मे.तहसिलदार, खानापूर-विटा यांचे क्र./वहिवाट/एस.आर./१५/२०१८ मधील दि.०५.०२.२०१९ रोजीचे न्यायनिर्णय व आदेशानुसार कोणतीही कार्यवाही करु नये, दावा मिळकतींतील वादी यांचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये व दावा मिळकतींची परिस्थिती जैसे-थे ठेवावी, असा त्यांचेविरुध्द अंतरिम मनाई आदेश होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१.** वादी यांचा निशाण १८ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी पुढील तारखेपावेतो मे.तहसिलदार, खानापूर-विटा यांचे क्र./वहिवाट/एस.आर./१५/२०१८ मधील दि.०५.०२.२०१९ रोजीचे न्यायनिर्णय व आदेशानुसार कोणतीही कार्यवाही करु नये, दावा मिळकतींतील वादी यांचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये व दावा मिळकतींची परिस्थिती जैसे-थे ठेवावी, असा त्यांचेविरुध्द आदेश करणेत येत आहे.

-

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2022.04.26 18:01:33 +0530

**दिनांकः२७/०४/२०२२.** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर विटा,**

**ता.खानापूर. जि.सांगली.**

Case No :RCS No 356 of 2022
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer:V.A.Mane
Court Name: 2nd Jt. Civil & Criminal Court, Vita. Dist.Sangli.
Date of decision : 27.04.2022
Order signed by P.O.on : 27.04.2022
Order uploaded on :28.4.2022